# चंद्रपूर जिल्हा पोलीस

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२५ एप्रिल, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7447744100 (PRO)


# चंद्रपुर पोलीसांची हातभट्टी दारू तयार करणाऱ्याविरूध्द कार्यवाही

## हातभट्टी साहित्यासह एकुण २३ लक्ष ८० हजार ५०० रू चा मुद्देमाल जप्त

सद्या कोरोना विषाणु संसर्ग संपुर्ण देशभरात पसरला असुन चंद्रपुर जिल्हा पोलीस विभाग कोरोना विषाणु जिल्हयात पसरू नये यासाठी योग्य ती उपाययोजना करत आहेत सोबतच अवैध धंदे करणाऱ्याविरूध्द सुध्दा कार्यवाही करीत आहे. चंद्रपुर जिल्हयातील हातभट्टीद्वारे मोहा दारू तयार करणाऱ्याविरूध्द मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात वेळोवेळी मोहिमा राबवुन मोहा दारू तयार करणाऱ्याच्या मुसक्या आवळल्या आहे. यामध्ये एकुण २३ लक्ष ८० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक २४ एप्रिल २०२० रोजी पोलीस स्टेशन दुर्गापुर येथील पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम मौजा पायली शिवार ईरई नदीजवळ काही इसम मोहा दारू तयार करण्याकरीता ड्रम लावलेले आहे. अशा माहितीवरून दुर्गापुर पोलीस पथकाने मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी छापा टाकला असता, ४० प्लास्टीक ड्रम ४००० लीटर मोहा सडवा किं. ८,००,०००/—रू, ३० प्लास्टीकच्या लहान कॅनमध्ये ६०० लीटर मोहा सडवा किं. १,२०,०००/—रू, मोहाफुल गावठी दारू १५० लीटर किं. ४५,०००/—रू, एक दुचाकी एमएच ३४ बीजे २४३४ किं. ५५,०००/—रू, आणि इतर साहीत्य असा एकुण **१०,४०,०००/—रू** चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस निरिक्षक श्री. दिपक खोब्रागडे, पोउपनि. प्रविण सोनोणे, पोहवा सुनिल गौरकार, अशोक मंजुळकर, पोना. उमेश वाघमारे यांनी पार पाडली.

**पोलीस स्टेशन सिंदेवाही** येथील पोलीस पथकाने दिनांक २१ एप्रिल २०२० रोजी वॉश ऑउट मोहिम राबवुन मौजा सरडपार येथील नाल्याजवळी मोहा हातभट्टीवर छापा टाकला असता, ८० प्लास्टीक ड्रम मध्ये ४,००० किलो किं. १०,००,०००/—रू, ३० नग मातीच्या मटक्यामध्ये ७५० किलो किं. ११,८७,५००/—रू, असा एकुण ११,८७,५००/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी ब्रम्हपुरी श्री. मिलींद शिंदे, ठाणेदार सपोनि. श्री. रामटेके, पोउपनि. सोनवने, पोउपनि. नेरकर, पोउपनि. पाटील आणि सिंदेवाही येथील पोलीस पथकाने पार पाडली.

**पोलीस स्टेशन रामनगर** येथील पोलीस पथकाने दिनांक २२/०४/२०२० रोजी गोपनीय माहिती वरून लोहारा जंगलपरिसरात छापा टाकला असता, एकुण १,०३,०००/—रू ची मोहा सडवा दारू आणि इतर साहीत्य जप्त करण्यात आले आहे.

**स्थानिक गुन्हे शाखेच्या** पथकाने दिनांक २२/०४/२०२० रोजी महाकाली कॉलरी आंनद नगर येथे मिळालेल्या गोपनीय माहितीवरून छापा टाकला असता, ५०,०००/— किंमतीची मोहा सडवा दारू आणि इतर साहीत्य जप्त करण्यात आले आहे.